REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# ''सहकारी साखर उद्योग आणि खाजगीकरण''

**मनिषा रणजित पवार, डॉ. जयश्री उपाध्ये**
[१]संशोधक विद्यार्थीनी, प्रो. रामकृष्ण मोरे आर्ट, कॉमर्स व सायन्स कॉलेज, आकुर्डी, पुणे.
[२]मार्गदर्शक, आबेदा इनामदार कॉलेज, कॅम्प, पुणे.

**सारांश :**

निंदकाचे घर असावे शेजारी या नात्याने सहकारू जगविण्यासाठी त्याच्या शेजारी खाजगी कारखाना असावा. व खाजगीतील दोष रोखण्यासाठी त्याच्या शेजारी सहकार असला पाहिजे. खाजगीशी तुल्यबळ स्पर्धा करण्यासाठी सहकाराने सदैव सज्ञ असले पाहिजे. दोघांतील निकोप स्पर्धा सर्वांच्याच फायद्याची आहे.

## प्रस्तावना :

महाराष्ट्रातील साखर उद्योग हा आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा उद्योग आहे. सहकारी साखर कारखान्यांनी महाराष्ट्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महाराष्ट्रात सहकारी कारखानदारीमुळे अल्कोहोल, वीज निर्मिती, कागद, ॲसिड, पशुखाद्य, मिठाई हे पदार्थ तसेच खत उद्योग इ. उद्योगांमुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास हातभगार लागला आहे. मात्र बदलत्या स्पर्धात्मक वातावरणात सहकारी साखर उद्योग अडचणीत सापडला आहे. साखरेची किमान वैधानिक किंमत केंद्र व राज्य सरकारचे नियंत्रण मुक्तीचे धोरण यामुळे सहकारी साखर उद्योग अडचणीत सापडला आहे.

## महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाचा इतिहास :

महाराष्ट्रात सर्वप्रथम १९९१ मध्ये ब्रिटीशांनी पहिला साखर कारखाना अहमदनगर जिल्ह्यात हरेगाव येथे सुरू केला. सहकारी क्षेत्रामध्ये साखर कारखाना उभारणीची कल्पना सन १९१२ मध्ये श्री. आर. एन. हिरेमठ आत्रण जी. एन. सहस्त्रबुद्धे यांनी मांडली. १९१८ मध्ये दि निरा व्हॅली सहकारी साखर कारखाना या नावाने महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना पुणे जिल्ह्यातील बारामती येथे सुरू केला. पुढे हा कारखाना बंद पडला. सन १९५० मध्ये सहकार महर्षी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी अहमदनगर जिल्ह्यातील लोणी या ठिकाणी प्रवरा सहकारी साखर कारखाना सुरू केला. हा साखर कारखाना महाराष्ट्रातील साखर उद्योगाला स्फूर्तीस्थान ठरला.



## महाराष्ट्रातील खाजकी साखर उद्योगाचा इतिहास :

सन १९४०-४५ च्या सुमारास महाराष्ट्रातील अगदी मोजके खाजगी साखर कारखाने होते. १९३६ च्या सुमारास नगर, नाशिक, सोलापूर पट्ट्यात निरा, प्रवरा, गोदावरी पाटबंधाऱ्याच्या सुविधा निर्माण झाल्याने ऊस शेती वाढत होती. तोपर्यंत यापैकी बहुतांशी

ऊसापासून गुळच तयार केला जात असे. १९५०-५२ च्या सुमारास राधानगरी येथे धरण बांधून झाल्यावर कोल्हापूर जिल्ह्यातही ऊस शेती मोठ्या प्रमाणावर वाढली. त्या काळात महाराष्ट्रात जे काही खाजगी कारखाने होते. त्यांनी शेतकऱ्यांकडून खंडाने जमिनी घेऊन स्वत:चे ऊसमळे मोठ्या प्रमाणावर वाढवले होते. सर्वच खाजगी कारखान्यांनी आपले ऊसमळे अत्यंत काटेकोरपणे पिकवले होते.

पुढे सराकरने सहकारी साखर कारखान्यांवर आपले कृपाछत्र धरून सहकारी साखर कारखान्यांचे उदात्तीकरण केले व खाजगी कारखान्यांचे पद्धतशीरपणे खच्चीकरण केले.

उद्योग खाजगी असो वा सहकारी असो. व्यवस्तापकांनी व्यवस्थापनाची व्यावसायिकता जोपासणे व ती वाढीला लावणे ही प्रमुख जबाबदारी असते. त्यात कसूर झाली तर त्या उद्योगाला अपयशाला सामोरे जावे लागते व असा अकार्यक्षक उद्योग समाज फार काळ सहन करत नाही. त्या उद्योगाचा सर्वनाश अटळ असतो. आज सहकारी साखर उद्योगाची परिस्थिती काहीशी तशी दिसते. राज्यातील निम्म्याहून अधिक कारखाने बंद/आजारी आहेत. हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच कारखाने सुस्थितीत आहेत. तर बाकी कारखान्यांची परिस्थिती चिंताजनक आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेली सहकारी व्यवस्था संपुष्टात येईल.

१९९० पासून देशात आर्थिक परिवर्तनासाठी मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. तेव्हापासून देशातील अर्थव्यवस्थेला अभूतपूर्व मुलभूत बदलांना सामोरे जावे लागत आहे. प्रामुख्याने सर्व व्यापाऱ्याचे जागतिकीकरण झपाट्याने होत आहे. सहकार उद्योग धंद्यातील आपला हस्तक्षेप हळूहळू काढत आहे. त्यामुळे खाजकीकरण अपरिहार्य झाले आहे. त्यामुळे मोठमोठ्या खाजगी कंपन्या उद्योगधंद्यात प्रवेश करीत आहेत. परकीय भांडवलाचा ओघ व परकीय तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात येत आहे. मात्र त्याचा अनिष्ठ परिणाम सहकारी उद्योग व लहान शेतकऱ्यांवर होत आाहे.

गेल्या दशकाचा विचार करता महाराष्ट्रातील साखर उद्योग प्रगतीपथावर दिसून येत होता. सध्या या उद्योगाला अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. कोणत्याही उद्योगाची प्रगती त्यांच्या उत्पादनावरून तसेच संख्येवरून ठरवणे योग्य होणार नाही. यामद्ये मागणी, किंमत, निर्यात इ. घटकांचा कायमस्वरूपी विचार करावा लागतो. कारण जी वाढ/प्रगती आहे ती कायमस्वरूपी व दीर्घकालीन स्वरूपात असावी. आज महाराष्ट्रात बरेच सहकारी साखर कारखाने कमी जास्त प्रमाणात आजारी आहेत. त्यापैकी काही बंद झाले आहेत. जे सुरू आहेत. त्यांना गंभीर स्वरुपाच्या आर्थिक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे.

कारखाना व्यवस्थापनात खाजगी कारखाने सहकारी साखर कारखान्यांपेक्षा सरस आहेत. साखर उताऱ्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी प्रयत्न करायला हवेत. यासाठी योग्य व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. गाळप वेळेवर झाले तरच साखर उतारा चांगला मिळतो.

हळूहळू खाजगीचे आव्हान आता सहकारी साखर कारखानदारीला मारक ठरत आहेत. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांनी आतापासूनच त्यांच्या व्यवस्थापनात हवे ते बदल करणची गरज आहे. तसेच उप-पदार्थ निर्मिती ही काळाची गरज बनलेली आहे. मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्वीकारामुळे साखर उद्योगापुढे कधी नव्हती एवढी संधी मिळाली आहे. त्या संधीचे सोन्यात रुपांतर करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाने स्वीकारली पाहिजे.

खाजगी क्षेत्रामध्ये बरेच नाविन्य आणले जात आहे. ते नाविन्य आणले जात आहे. ते नाविन्य सहकारात ताबडतोब आले पाहिजे. किंबहुना ते शक्यही आहे. पण तशी मानसिकता सहकाराने तयार केली पाहिजे. खाजगी विरूद्ध खाजगी आणि खाजगी विरूद्ध सहकार या स्पर्धेमुळे या उद्योगामध्ये किफायतशीरपणा येईल. प्रत्येक कारखान्याने व्हॅल्यु मेट्रिक्सचे गणित तयार

करणे आवश्यक आहे. तसेच तांत्रिक कार्यक्षमतेचे घटक सुस्थितीत ठेवणे व अतांत्रिक घटकांमध्ये नाविन्याच्या माध्यमातून किफायतशीरपणा आणणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१) डॉ. वसंतराव जुगळे, सौ. योजना जुगळे, साखर उद्योगाची परवाना मुक्ती आणि विनियंत्रण, सेंटर फॉर सोशल स्टडीज अॅण्ड रिसर्च, सांगली.

२) बी. बी. ठोंबरे, शेती प्रगती, नॅचरल शुगरचा आदर्श मानदंड, पान क्र. ३०-३१.

३) श्री. सुभाष देशमुख, शेतीप्रगती, खाजगी-सहकारीच्या सिमारेषा कधीच पुसल्या, पान क्र. ३७-३८.

४) डी. एस. गुरव, शेती प्रगती, खाजगी कारखानयंनी जोपासली व्यावसायिकता, पान क्र. ४९, ५०.